RNI NO. MAHMAR/2020/84035




BAHUJAN SAURABHA
# बहुजन सौरभ




शुक्रवार, ०९ मे २०२५ | वर्ष : ५ | अंक : १३१ | दैनिक | किंमत : ₹५/-
Friday, 09 May 2025 | Year : 5 | Issue : 131 | Daily | Rate: Rs. 5/-

# राहुल गांधींचे नेतृत्व ते 'इंडिया आघाडी'चे भवितव्य : शरद पवार




**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी बुधवारी भारतीय लष्कराद्वारे राबविण्यात आलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'चे कौतुक केले आणि भारतीय सशस्त्र दलांनी पर्यटकांवर झालेल्या पहलगाम दहशतवादी हल्ल्याचे योग्य प्रत्युत्तर दिल्याचे म्हटले. भारत आणि पाकिस्तानमधील तीव्र संघर्षापासून ते पहलगाम घटनेविरुद्ध जम्मू आणि काश्मीरमध्ये व्यक्त झालेल्या संतापापर्यंत विविध मुद्द्यांवर बोलले. शरद पवार हे देशातील सर्वांत अनुभवी राजकारण्यांपैकी एक आहेत. 1990 च्या दशकाच्या सुरुवातीला पी.व्ही. नरसिंह राव सरकारमध्ये ते केंद्रीय संरक्षणमंत्री होते. शरद पवार यांनी त्यांच्या पक्षासमोरील पेचप्रसंग, विरोधी पक्ष इंडिया आघाडीची स्थिती आणि भविष्य, तसेच राहुल गांधी यांच्या नेतृत्वाबद्दल भाष्य केले.

ते कठोर परिश्रम घेतात. जेव्हा देशात समस्या उद्भवतात तेव्हा त्यावर प्रतिक्रिया देतात. पण आज राहुल गांधींसाठी काहीतरी मोठे करण्यासाठी असे वातावरण नाही. मी फक्त एवढेच म्हणेन की, त्यांनी तळागाळात आणखी आक्रमकतेने काम करण्याची गरज आहे. फक्त राहुल गांधीच नाही, तर सर्व विरोधी पक्षांनी हे करण्याची गरज आहे.

महाराष्ट्रातील परिस्थिती आमच्या बाजूने होती. लोकसभा निवडणुकीचा निकाल आमच्या बाजूने होता. तेव्हा विधानसभा निवडणुकांमध्ये काय झाले? आम्ही ज्या ठिकाणी जातो त्या प्रत्येक गावातील लोक म्हणतात की, आम्ही लोकसभा निवडणुकीत जसे मतदान केले होते, तसेच विधानसभा निवडणुकीतही केले; पण निकाल वेगळा होता. मी निवडणूक आयोगाबद्दल काही विधान करू इच्छित नाही.



इंडिया आघाडी आज सक्रिय नाही. त्यामुळे आम्हाला पुन्हा एकत्र यावे लागेल. आमच्या पक्षाची पुनर्बांधणी करावी लागेल. तरुणांना त्यात सामील करावे लागेल आणि काम करावे लागेल. ते राजकारणासाठी नव्हते. शैक्षणिक संस्थांसह अनेक संस्था आहेत, जिथे आम्ही त्यांच्याबरोबर, एनडीएबरोबर, डाव्या पक्षांबरोबर काम करतो आणि आम्ही ते करत राहू. मी आशावादी आहे. या देशात संसदीय लोकशाही आपल्यामुळे नाही; तर ती सामान्य लोकांच्या समजदारीमुळे कार्यरत आहे.

## विधानभवनाच्या विस्तारासाठी स्वतःची जागा सोडण्याची शासकीय मुद्राणालयावर वेळ

**नागपूर :** विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेश काळात कामकाजासाठी लागणाऱ्या सर्व दैनंदिन कागदपत्रांची छपाई करणारे विधानभवनालगतच असलेले शासकीय मुद्रणालय आता नव्या जागेच्या शोधात आहे. प्रस्तावित विधानभवनाच्या विस्तारासाठी या मुद्राणलयाच जागा घेण्यात येणार आहे. दरवर्षी विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन नागपुरात होते. अधिवेशना दरम्यान विधानसभा आणि विधान परिषदेसाठी लागणारे प्रश्नउत्तराचे संच, लक्षवेधी सूचना, त्यावरील मंत्र्यांची निवेदने, नियम 93च्या सूचना, त्यावरील सरकारी निवेदने, कामकाज पत्रिका आणि इतरही अधिवेशनासंबधीचे कागदपत्रे छपाईचे काम या सरकारी मुद्राणलायत होते. अधिवेशन काळात मुद्राणलय चोवीस तास सुरू राहते. अत्यंत महत्वाचे हे काम आहे. उद्योग मंत्रालयाच्या अखत्यारित हे मुद्राणालय येते. विधानभवनाच्या लागूच त्याची इमारत आहे. विधानभवनाचा विस्तार करण्याचा निर्णय विधानसभा अध्यक्षांनी घेतला आहे. त्यासाठी जागेची गरज आहे.

शासनाच्या दोन विभागातील वादात अडकलेल्या नागपूर विधान भवन विस्ताराचा तिढा सोडवण्यात पालकमंत्री व राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पुढाकार घेतला असून शासकीय मुद्रणालय आणि पुरवठा विभागाच्या कार्यालयांना शहरात नवीन जागेचा शोध घेण्याचे निर्देश त्यांनी दिले. नागपूर येथील शासकीय मुद्रणालयाच्या तसेच शहर पुरवठा विभागाच्या कार्यालयाची जागा नागपूर विधानभवनाच्या विस्तारीकरणासाठी आवश्यक आहे. त्यामुळे विस्तारीकरणाच्या कामात तिढा निर्माण झाला होता.



बुधवारी यासंदर्भात मुंबईत विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. त्यात बावनकुळे यांनी पुरवठा विभाग आणि शासकीय मुद्रणालय कार्यालयांना पर्यायी जागा शोधून प्रस्ताव सादर करावा, असे निर्देश दिले. विधानभवनाचा विस्तार करतांना याच परिसरात असलेले झिरो माईलही विकसित करण्यात येणार आहे, असेही बावनकुळे यांनी स्पष्ट केले. बावनकुळे म्हणाले, शासकीय मुद्रणालय आणि पुरवठा विभागाला नवीन जागा उपलब्ध करून देण्यात येईल. त्यांनी पुढील दोन दिवसात जागांचा शोध घेऊन त्याबाबत प्रस्ताव सादर करावा. पुरवठा विभागाला गोदामासाठी जागा उपलब्ध करून देण्यात येईल. त्या ठिकाणी बांधकाम करून दिल्यानंतरच संबंधित जागा ताब्यात घेण्यात येईल. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव संजय दशपुते, महसूल उपसचिव अश्विनी यमगर, एमएसआयडीसीचे मुख्य अभियंता रणजीत हांडे, उद्योग विभागाचे सहसचिव लक्ष्मीकांत ढोके, एमएसआयडीसीच्या कार्यकारी अभियंता आकांक्षा मेश्राम, एमएसआयडीसीचे व्यवस्थापक ब्रजेश दीक्षित उपस्थित होते.

## मालेगाव बॉम्ब स्फोट प्रकरणाचा निकाल 31 जुलै रोजी?

**मुंबई :** मालेगाव बॉम्ब स्फोट प्रकरणात अंतिम निकाल लवकरच सुनावला जाण्याची शक्यता आहे. विशेष राष्ट्रीय तपास संस्थेच्या (NIA) न्यायालयाने गुरूवारी सप्टेंबर 2008 मध्ये झालेल्या मालेगाव बॉम्ब स्फोट प्रकरणातील सर्व सात आरोपींना 31 जुलै रोजी हजर राहण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे या दिवशी या प्रकरणात अंतिम निकाल जाहीर होण्याची शक्यता आहे. विशेष न्यायाधीश ए.के. लाहोटी यांनी हा खटला मोठा असून यासाठी अधिक वेळ आवश्यक असल्याचे म्हटले आहे. सरकारी वकिलांनी आणि बचाव पक्षाने त्यांचा अंतिम लेखी युक्तिवाद सादर केल्यानंतर 19 एप्रिल रोजी या प्रकरणाची सुनावणी पूर्ण झाली. दरम्यान विशेष न्यायाधीशांची मुंबईच्या बाहेर बदली झाल्यानंतर फक्त निकाल जाहीर करण्यासाठी त्यांना 31 ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

या प्रकरणात गंभीर आरोप असलेल्या भाजपाच्या माजी खासदार प्रज्ञा सिंग ठाकुर यांनी याबद्दल प्रतिक्रिया दिली आहे. 'न्यायमूर्ती जशी तारीख देतात तशीच आजही दिली. आज निर्णय होणार असे काही निश्चित नव्हते. पुढील तारखेला निर्णय होईल हे निश्चित आहे. न्यायाधीशांनी सांगितले की त्याचे (निर्णयाचे) एक लाखाहून जास्त पाने आहेत आणि हे मोठे



प्रकरण आहे, यासाठी वेळ लागतो. कोणावरच अन्याय होता कामा नये. त्यानंतर त्यांनी 31 जुलै ही पुढील तारीख दिली आहे,' अशी माहिती भाजपाच्या माजी खासदार प्रज्ञा सिंह ठाकूर यांनी दिली. निकाल काय लागेल याबद्दल बोलतांना ठाकूर म्हणाल्या की, 'सत्य मेव जयते, यावर माझा पूर्ण विश्वास आहे. या प्रकरणाला 17 वर्ष झाली. ज्या व्यक्तीवर आरोप होतात एकतर त्याला सत्य ठाऊक असते किंवा ईश्वराला. त्यामुळे माझा विश्वास आहे की, सत्य मेव जयते. सत्याचा कायम विजय होतो, धर्माचा कायम विजय होतो आणि यावेळी देखील होईल.' सरकारी वकिलांकडून मृत्युदंडाच्या शिक्षेची मागणी केली जात असल्याबद्दल विचारले असता ठाकुर म्हणाल्या की, 'एटीएसला शक्य असते तर त्यांनी त्याच दिवशी माझी मान मुरगळून टाकली असती. त्यांचे माझ्याशी इतके शत्रुत्व आहे आणि शत्रुत्व का आहे माहिती नाही.

## 'लाहोर सोडा', अमेरिकेच्या आपल्या नागरिकांना सूचना



**नवी दिल्ली :** जम्मू आणि काश्मीर येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याला भारत सरकारने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंध चांगलेच ताणले गेले आहेत. यादरम्यान संरक्षण मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनामध्ये भारतीय लष्कराने पाकिस्तानच्या लाहोरजवळील एअर डिफेन्स सिस्टीम उद्ध्वस्त केल्याची माहिती दिली आहे. याबरोबरच पाकिस्तानकडून होणाऱ्या कारवायांना जशास तसे उत्तर दिले जाईल, असा स्पष्ट इशारा देखील या निवेदनात देण्यात आला आहे. भारत पाकिस्तान यांच्यातील वाढत्या तणावादरम्यान अमेरिकेने पाकिस्तानच्या लाहोरमध्ये असलेल्या त्यांच्या नागरिकांसाठी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. ड्रोनचे स्फोट, ड्रोन पाडल्याचे तसेच लाहोरच्या जवळपासच्या हवाई हद्दीत घुसखोरी झाल्याचे वृत्त समोर आल्यानंतर अमेरिकेने पाकिस्तानच्या लाहोरमधील त्यांच्या वाणिज्य दूतावासातील सर्व कर्मचाऱ्यांना सुरक्षित ठिकाणी आश्रय घेण्याचे निर्देश दिले आहेत.

अमेरिकने जे नागरिक संघर्ष सुरू असलेल्या ठिकाणांच्या जवळपास असतील, त्यांना सुरक्षितपणे शक्य असल्यास तो भाग सोडावा असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच बाहेर पडणे सुरक्षित नसेल तर त्यांनी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा, असे अमेरिकेकडून त्यांच्या नागरिकांना सांगण्यात आले आहे.

अमेरिकेने संघर्ष सुरू असलेल्या भागात असलेल्या त्यांच्या नागरिकांनी काय करावे याबद्दलही स्पष्ट सूचना दिल्या आहेत.

## पवित्र बुद्धधातूंच्या लिलावास भारताचा विरोध

**नवी दिल्ली :** भारत सरकारच्या कायदेशीर कारवाईच्या इशाऱ्यानंतर सदबीज या आंतरराष्ट्रीय लिलाव कंपनीने बुद्धधातूशी संबंधित असलेला पवित्र रत्नांच्या हाँगकाँग येथील लिलाव आता पुढे ढकलला आहे. या मौल्यवान संग्रहाचे वर्णन एक 'महत्त्वाचा पुरातत्त्वीय शोध' असे करण्यात आले होते. या लिलावात बुद्धधातूशी संबंधित होणाऱ्या रत्नांच्या विक्रीवर जगभरातील बौद्ध धर्मीय विद्वान आणि भिक्षू तसेच संबंधित अनेक प्रमुख बौद्ध संस्थांच्या प्रमुखांनी टीका केली होती. भारत सरकारने हा लिलाव म्हणजे जगभरातील बौद्ध समुदायाचा अपमानच आहे, असे म्हणत जोरदार आक्षेप घेतला होता. भारत सरकारच्या हस्तक्षेपामुळे सदबीजने जाहीर केले की, लिलाव पुढे ढकलल्यामुळे संबंधितांना चर्चा करण्यास अधिक वेळ मिळेल. ब्रिटिश अधिकारी विल्यम क्लॅक्स्टन पेप्पे यांनी सुमारे 130 वर्षांपूर्वी भारताच्या उत्तरेकडील भागात या अवशेषांचा (बुद्धधातूचा) शोध लावला होता. या अवशेषांमध्ये गौतम बुद्धांच्या शरीरधातूंचाही समावेश असल्याचे मानले जाते. 'पिप्रहवा जेम्स ऑफ द हिस्टॉरिकल बुद्धा, मौर्य साम्राज्य, अशोककालीन युग, इ.स.पू. 240-200' या नावाने ओळखला जाणारा हा संग्रह 7 मे रोजी लिलावासाठी ठेवण्यात येणार होता. लिलाव होण्याच्या दोन दिवस आधी भारत सरकारने लिलाव संस्थेला पत्र लिहून आक्षेप घेत कळवले की, हे अवशेष भारतीय तसेच जागतिक बौद्ध समुदायाची सांस्कृतिक ओळख आहेत. हा लिलावामुळे भारतीय आणि आंतरराष्ट्रीय कायद्यांचा तसेच संयुक्त राष्ट्रांच्या करारांचा भंग होत आहे. भारत सरकारच्या एका उच्चस्तरीय



प्रतिनिधी मंडळाने मंगळवारी (6मे) सदबीजच्या प्रतिनिधींशी चर्चा केली. सदबीजने ई-मेलद्वारे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, भारत सरकारने उपस्थित केलेल्या मुद्द्यांचा विचार करून आणि वस्तू विक्रीसाठी पाठवणाऱ्या व्यक्तींच्या संमतीने हा लिलाव पुढे ढकलण्यात आला आहे. तसेच, या संदर्भातील चर्चांबाबतची माहिती आवश्यकतेनुसार शेअर केली जाईल. बुधवारी लिलावाची घोषणा सदबीजच्या संकेतस्थळावरून काढून टाकण्यात आली आणि लिलावासाठी तयार केलेले वेबपेजही आता उपलब्ध नाही. विल्यम क्लॅक्स्टन पेप्पे हे इंग्लिश इस्टेट मॅनेजर होते. त्यांनी पिप्रहवा (गौतम बुद्धांचे जन्मस्थान असलेल्या लुंबिनीच्या थोड्याच दक्षिणेस) हे बुद्धांचे जन्मस्थान मानले जाते. इथे असलेला एक स्तूप पेप्पे यांनी उकरून काढला.

## लाहोरमधील पाकिस्तानची एअर डिफेन्स सिस्टीम उद्ध्वस्त!




**नवी दिल्ली :** पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर प्रत्युत्तरादाखल भारताने सुरू केलेले ऑपरेशन सिंदूर अजूनही चालू असल्याचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आज सकाळी सर्वपक्षीय बैठकीत सांगितले. त्याच्या काही तासांत संरक्षण मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनामध्ये भारतीय लष्कराने थेट पाकिस्तानच्या लाहोरजवळील एअर डिफेन्स सिस्टीम उद्ध्वस्त केल्याचे नमूद करण्यात आले आहे. पाकिस्तानकडून होणाऱ्या कारवायांना जशास तसं उत्तर दिलह्य जाईल, असा स्पष्ट इशारा या निवेदनात देण्यात आला आहे.

बुधवारी पहाटे केलेल्या एअर स्ट्राईकमध्ये भारतानं पाकिस्तानातील दहशतवादी तळ लक्ष्य केले होते. गुरुवारी सकाळच्या कारवाईत पाकिस्तानात विविध ठिकाणी उभारण्यात आलेल्या एअर डिफेन्स रडार सिस्टीमला भारतीय हवाई दलाने लक्ष्य केल्याची माहिती या निवेदनात देण्यात आली आहे. 'पाकिस्तान ज्या प्रकारे कारवाई करेल, त्याच पद्धतीने भारताकडून उत्तर दिले जाईल. अशी खात्रीलायक माहिती समोर आली आहे की लाहोरजवळील एअर डिफेन्स सिस्टीम उद्ध्वस्त झाली आहे', असे संरक्षण मंत्रालयाच्या निवेदनात म्हटले आहे. भारतीय लष्कराच्या या कारवाईमुळे पाकिस्तानच्या हवाई कारवाया मोठ्या प्रमाणावर थोपवून धरण्यास मदत होणार आहे.







“ शांतपणे विचार करून घेतलेले निर्णय नेहमी योग्य ठरतात. ”



## संपादकीय

### पर्यावरणपूरक विद्युत वाहनांचा वापर

पर्यावरणपूरक विद्युत वाहनांना प्रोत्साहन देण्याचे धोरण महाराष्ट्र सरकारने स्वीकारले असून राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत या दिशेने अनेक निर्णय घेण्यात आले हे निश्चित स्वागतार्ह आहे. राज्य सरकारने घेतलेल्या या निर्णयाप्रमाणे राज्यातील तीन मोठ्या महामार्गांवर विद्युत वाहनांना टोलमाफी देण्यात येणार आहे, त्याशिवाय राष्ट्रीय महामार्गावर विविध ठिकाणी चार्जिंग स्टेशन्स उभारली जाणार आहेत आणि राज्य व राष्ट्रीय महामार्गावर काही ठिकाणी पथकरामध्ये सवलतही दिली जाणार आहे. एवढेच नव्हे तर मोटर वाहन करातून तसे नोंदणी प्रमाणपत्राच्या नूतनीकरण शुल्कातूनसुद्धा विद्युत वाहनांना सवलत दिली जाणार आहे. 2030 पर्यंत विद्युत वाहने खरेदी करणाऱ्यांनासुद्धा काही प्रोत्साहनपर सवलत देण्यात येणार आहे. हे सर्वच निर्णय महत्त्वाचे आहेत. गेल्या काही वर्षांच्या कालावधीपासून जगात, देशात आणि महाराष्ट्रातसुद्धा इलेक्ट्रिक वाहनांची लोकप्रियता वाढत चालली असली, तरी ज्या प्रमाणात या वाहनांना प्रतिसाद मिळणे गरजेचे होते तेवढा प्रतिसाद अद्याप मिळालेला नाही हेसुद्धा खरे आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने घेतलेल्या या विविध निर्णयांचा विचार करावा लागणार आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे केंद्र सरकार किंवा राज्य सरकार जेव्हा एखादे धोरण जाहीर करते तेव्हा त्या धोरणाची अंमलबजावणी करताना इतर सहाय्यक अनुषंगिक बाबी अस्तित्वात आहेत की नाही हेसुद्धा पाहावे लागते. साहजिकच काही वर्षांपूर्वी जेव्हा केंद्र सरकारने पर्यावरणपूरक विद्युत वाहनांना प्रोत्साहन देण्याचे धोरण जाहीर केले होते तेव्हा ही वाहने ज्या विद्युत ऊर्जेवर चालतात ती विद्युत ऊर्जा पुरेशा प्रमाणात आणि सोयीस्कररित्या उपलब्ध आहे की नाही याचा विचार झाला नाही. प्रतिसाद मिळालेला नाही. आता राज्य सरकारने घेतलेल्या या निर्णयाप्रमाणे वाहनांसाठी चार्जिंग स्टेशन उभारण्याला प्रोत्साहन देण्यात येणार आहे. राज्य व राष्ट्रीय महामार्गावर प्रत्येकी 25 किलोमीटर अंतरावर चार्जिंग सुविधा उभारली जाणार आहे. पण सरकारच्या ही गोष्ट खूप उशिरा लक्षात आली. आजपर्यंत जेवढ्या प्रमाणात विद्युत वाहनांची विक्री झाली त्या सर्व वाहन मालकांना आपल्या वाहनांचे चार्जिंग करताना गैरसोयच सहन करावी लागत होती हे वास्तव आहे. जेवढ्या मोठ्या प्रमाणात आणि मोठ्या संख्येने आज पेट्रोल, डीझेलचे पंप उपलब्ध आहेत, त्याच्या तुलनेने इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग स्टेशन्स खूपच कमी प्रमाणात उपलब्ध आहेत. ही गोष्ट लक्षात घेऊनच सर्वसामान्य नागरिक इलेक्ट्रिक वाहनांकडे वळण्यापूर्वी हजार वेळा विचार करत आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे आता इलेक्ट्रिक वाहनांचे धोरण जाहीर झाल्यानंतर किंवा केंद्र सरकारने जेव्हा इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेतला, त्यानंतर निर्माण झालेल्या रहिवासी इमारतींमध्ये पार्किंग स्पेसमध्ये किंवा अन्यत्र चार्जिंगची सुविधा जरी उपलब्ध करण्याचा निर्णय घेण्यात आला असला तरी त्यापूर्वी अस्तित्वात असलेल्या लाखो इमारतींमध्ये राहणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांसाठी मात्र अशा प्रकारची सुविधा निर्माण करणे हे एक मोठे आव्हान आहे. साहजिकच प्रवासाला सुरुवात करण्यापूर्वी आपले वाहन घरातल्या घरात चार्जिंग करणे अशक्य आहे. प्रवासाला सुरुवात केल्यानंतरसुद्धा वाहनांचे चार्जिंग स्टेशन शोधणे हा एक मनस्तापाचा विषय झाला आहे. मोठ्या उत्सुकतेने इलेक्ट्रिक वाहने खरेदी करणाऱ्यांचे हे अनुभव इतरांनी ऐकल्यामुळेच अनेकांनी या वाहनांकडे पाठ फिरवली हेसुद्धा या निमित्ताने लक्षात घ्यावे लागणार आहे. आता राज्य सरकारने आपल्या या धोरणामध्ये जाहीर केल्याप्रमाणे त्वरित आणि जलदगतीने राज्य आणि राष्ट्रीय महामार्गावर इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग स्टेशनची उपलब्धता करण्यास प्राधान्य द्यायला हवे. देशातील महानगरांमध्ये जेवढ्या मोठ्या प्रमाणात सध्या वाहनांच्या धुरामुळे प्रदूषण निर्माण होत आहे आणि या प्रदूषणामुळे निर्माण होणारी रोगराई किंवा इतर अनुषंगिक समस्या यांचा विचार करता आणि या समस्यांवर होणाऱ्या खर्चाचा विचार करता सरकारला प्राधान्याने आता पर्यावरणपूरक वाहनांना सोयी सवलती उपलब्ध करून द्याव्या लागतील. महत्त्वाची गोष्ट म्हणजे इलेक्ट्रिक वाहनांच्या खरेदीसाठी सर्वसामान्य नागरिकांचे अधिक जास्त प्रमाणात प्रबोधन होणे गरजेचे आहे. अजूनही अनेकांच्या मनात या वाहनांबाबत साशंकता आहे. आता महाराष्ट्र सरकारने तरी किमान आपल्या ईव्ही धोरणाचा एक भाग म्हणून सर्वसामान्य नागरिकांच्या मनातील शंका दूर करण्यासाठीसुद्धा काही प्रबोधन करण्याची गरज आहे. जगाच्या पाठीवरील काही देशांमध्ये सध्या फक्त इलेक्ट्रिक वाहनांचा वापर केला आहे आणि तेथील पर्यावरणामध्ये लक्षणीय सुधारणा झाली आहे, हे पाहता महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यामध्ये राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणीसुद्धा करून राज्यात पर्यावरणपूरक सकारात्मक वातावरण तयार करण्याच्या दिशेने पावले उचलण्याची गरज आहे. ■ ■ बहुजन सौरभ

## ऑपरेशन सिंदूरने पहलगाम हल्ल्याचा बदला..

**काश्मीर हे भारताचे नंदनवन. जगातील पर्यटकाचे आकर्षण. जगभरातून पर्यटक येतात. हंगामात त्यांची रोजची संख्या 70 हजारांवर असते. या पर्यटनातून अर्थव्यवस्थेला बळ मिळते. लोकांना रोजगार मिळतो. व्यवसायिक, हॉटेलवाले, घोडेवाले, ट्रव्हल्सवाले आदींचा व्यवसाय फुलतो. समृद्धीकडे वाटचाल सुरु होते. या अगोदर कोरोना आला. कलम 370 हटविले. मोदी सरकारने अनेक निर्बंध लादले. त्यामुळे काश्मीरी पर्यटनाला खिळ बसली. लोकांपुढे जगण्या मरण्याचा प्रश्न निर्माण झाला. निवडणुकाही रखडल्या होत्या. प्रकरण न्यायालयात गेले. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशान्वये निवडणुका घ्याव्या लागल्या. त्या शांततेत पार पडल्या. लोकशाही पद्धतीने नवे सरकार आले. कटूता मावळली. काश्मीरींनी स्वतःला सावरले. केंद्र सरकार चुकत होते.**

सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय योग्य होता. यावर शिक्कामोर्तब झाले. पुन्हा काश्मीर नव्या जोमाने उभा राहिला. शाळा उघडल्या. मुलें हसू, खेळू लागली. आनंदाचे वारे वाहू लागले. ते केंद्र सरकारला सांभाळता आले नाही. सुरक्षेत चुक झाली. पाचसात दहशतवाद्यांनी पर्यटकांवर हल्ला केला. या हल्ल्याने काश्मीरी माणसे दुखावली. त्यांनी पाक समर्थित हल्याचा निषेध केला. अन् भारतीय एकजुटीचे दर्शन घडविले. या घटनांनी सारेच भारतीय सुखावले. पहलगाम हल्ल्याचा बदला. यास सरकारने प्राथमिकता दिली. पाकचा बदला हा सरकारचा प्रमुख अजेंडा बनला. पंधरा दिवसानी त्यावर अंमल केला. पाकचा हिशेब चुकता केला.

पाक सीमेत न जाता आपल्या हद्दीतून केलेल्या हल्ल्याला भारतीय हवाई दलाने 'ऑपरेशन सिंदूर' असे संबोधले. 7 मे 2025 रोजी मध्यरात्रीनंतर पाकव्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानातील 9 दहशतवादी तळांवर 24 क्षेपणास्त्र डागली. यात 100 वर अतिरेकी ठार झाले. तसेच मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. बहावलपूर, मरकज सुभान अल्लाह, जैस मरकज तोयबै, मुरीदके लष्कर तरजल, तेहरा कलां, मेहमूना जोया, सियालकोट, अहले अदिस, बरनाला, कोटली, शावई नाला कॅम्प, बिलाल कॅम्प मुजफ्फुराबाद आदी दहशतवादी तळ उध्वस्त झाले. मात्र पहलगाम हल्ल्यातील दहशतवादी हाती लागले नाहीत. ते मोकळे आहेत. खरे तर जासूस पाठवून त्यांना ठार करण्याची गरज होती. त्याऐवजी दुसरेच मारल्या गेले. त्यालाच माध्यमांनी पहलगाम हल्ल्याचा बदला म्हटले. या हल्ल्यानंतर दोन्ही देशात तणाव वाढला आहे. संयुक्त राष्ट्र संघाच्या सुरक्षा परिषदेने दोन्ही देशांना संयम बाळगण्याचे आवाहन केले. तसेच पाकिस्तानने भारतासोबत चर्चा करून तोडगा काढण्याचा सल्ला दिला. दहशतवाद्यांनी 22 एप्रिल 2025 रोजी काश्मीरमधील पहलगाम येथे पर्यटकांवर हल्ला केला. त्यात 28 जण ठार झाले होते. दहशतवादी सैनिकांच्या वेषात आले. पर्यटकांवर गोळ्या झाडल्या. पर्यटकांवरील हल्ल्याने काश्मीरी दुखावले. भारताने पाकिस्तानवर दहशतवादाला पाठिंबा देण्याचा आरोप केला. या घटनेनंतर भारताने कठोर पावले उचलली, ज्यात सिंधु जल करार स्थगित करणे, अटारी सीमा बंद करणे, पाकिस्तानी विमानांसाठी हवाई क्षेत्र बंद करणे आदींचा समावेश आहे. भारताच्या सिंधू नदी जल बंदी निर्णयाने पाकिस्तानची कोंडी झाली आहे. हा 1960 चा जल करार आहे. त्याला स्थगिती दिली. याशिवाय सिंधू, झेलम, चिनाब नद्यांचे पाणी रोखण्याची कारवाई सुरू केली. सिंधू नदीच्या पाण्यावर बरेच ओलित आहे. तांदूळ, कापूस, गहू, ऊस उत्पादनाला फटका बसेल. अनेक गावांच्या जल योजना बंद पडतील. पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण होईल. त्याचा कमीअधिक फटका 35 टक्के लोकसंख्येला बसू शकते. जलविद्यूत प्रकल्प बांधित होतील. त्यामुळे उद्योगांना झळ पोहचेल. शहरी पायाभूत सोयी प्रभावित होतील. सिंधू नदीवर आणखी नवी धरणे बांधली. तर पाकिस्तानकडे जाणारे पाणी मोठ्या प्रमातात अडविता येईल. त्याचे परिणाम तीव्र होतील.




भारत- पाक तंटा दीर्घ काळ चालला. तर त्याचे परिणाम पाकिस्तानला भोगावे लागतील. ज्या चार धरणांच्या जोरावर सिंधू नदीचे पाणी रोखण्याचा भाजप सरकारने निर्णय घेतला. त्यापैकी बगलिहार, सलाल व किसनगंगा ही तीन धरणे कॉंग्रेसच्या कार्यकाळात बांधण्यात आली. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे 2017 ते 2019 पर्यंत जल मंत्रालय असताना त्यांनी भारताच्या वाट्याचे पाणी देखील पाकिस्तानकडे जात असल्याचे निदर्शनास आणून दिले. या भागात दऱ्या-शिखर आहेत. या भौगोलिक स्थितीमुळे तिथे धरणे बांधणे अवघड असल्याचे अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले. त्यानंतर काही भागात सर्वे करण्यात आला. त्यावर पुढे सरकारने 2021 मध्ये रापेर धरणाला मंजूरी दिली. हा प्रकल्प चिनाब नदीवर असून 2026 पर्यंत पूर्ण होईल. ना. नितीन गडकरी यांनी पहिल्यांदा पाककडे जाणारे पाणी रोखणे शक्य असल्याचे निदर्शनास आणून दिले होते. तो धागा पकडून आता प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जलबंदीची घोषणा केली. त्यावर कृती केली. सलाल धरणाचे सर्व दरवाजे बंद करण्यात आले. त्याची झळ सुमारे तीन कोटी लोकांना लवकरच बसेल. भारत सिंधू नदीचे पाककडे जाणारे किती टक्के पाणी अडवू शकते. त्यावर जलबंदी निर्णयाची तीव्रता अवलंबून असेल. भारताकडे पुराचे शंभर टक्के पाणी अडविण्यांची क्षमता नाही. त्यासाठी आणखी नवी धरणे बांधावी लागतील. पुरावेळी जलबंदी नैसर्गिकदृष्ट्या संपुष्टात येईल. जुनपासून पावसाळा सुरू होणार. तोपर्यंत जलबंदीचा असर दिसेल. भारताच्या वाट्याचे हक्काचे पाणी सुद्धा आजच्या घडीला पाकिस्तानकडे वाहून जाते. या वस्तूस्थितीकडे दुर्लक्ष करता येत नाही. त्यासाठी सरकारला काही धाडसी निर्णय घ्यावे लागतील. नवी धरणे बांधावी लागतील. तेव्हाच प्रभावीपणे जलबंदीचा धाक वाढेल. हे विसरून चालणार नाही.




भूपेंद्र गणवीर

9850031019


भारतीय हवाई दलाने 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत दहशतवादी तळांवर हवाई हल्ले केले. भारतीय माध्यमांनी या हल्ल्याला पहलगाम हल्ल्याचा बदला म्हणून संबोधले, तर पाक माध्यमांनी नुकसान कमी असल्याचा दावा केला. तथापि, स्वतंत्र स्त्रोतांद्वारे नुकसानीची पुष्टी अद्याप झालेली नाही, त्यामुळे अचूक आकडेवारी बाबत अनिश्चितता आहे. हवाई हल्ल्यांमुळे पाकिस्तानला प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष आर्थिक नुकसान सहन करावे लागले. हल्ल्यांपूर्वीच भारताने पाकिस्तानवर आर्थिक निर्बंध लादले होते, ज्यात आयातावर पूर्ण बंदी. हवाई क्षेत्र बंद केले. त्याचा पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेला मोठा फटका बसला. हवाई क्षेत्र बंद आणि उड्डाणांवरील बंदीमुळे दररोज सुमारे 6 कोटी रुपयांचे नुकसान होत आहे. पाकिस्तानने संरक्षणासाठी 10 दिवसांत मोठ्या प्रमाणात खर्च केले. पाकिस्तानची अर्थव्यवस्था आधीच कर्ज, महागाई आणि बेरोजगारीने त्रस्त आहे. भारत पाकिस्तान स्टॉक एक्सचेंजमध्ये मोठी घसरण झाली. पाकिस्तानी रुपयाचे अवमूल्यन सातत्याने वाढत आहे. यामुळे पाकिस्तानातील गुंतवणूकदार भयभीत आहेत. हल्ल्यात ठार झालेल्या दहशतवाद्यांमध्ये लष्कर-ए-तैयबाशी संबंधित कमांडर असल्याचा दावा आहे. यामुळे पाकिस्तानच्या दहशतवादी नेटवर्कला धक्का बसला.

युद्धाची शक्यता वाढल्याने दोन्ही देशांमध्ये सैन्य तयारी वाढली. सीमेवर सैनिक टँक दिसू लागलेत. भारताने 244 जिल्ह्यांमध्ये सुरक्षा कवायतींचे आदेश दिले, तर पाकिस्तानने संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेकडे मध्यस्थीची मागणी केली. ऑपरेशन सिंदूरमुळे पाकिस्तानला लष्करी, आर्थिक आणि कूटनीतिक पातळीवर जबरदस्त झटका बसला. शंभराहून दहशतवादी ठार होणे. आर्थिक संकटांचा सामना करणे. जागतिक स्तरावर एकटे पडणे. यामुळे पाकिस्तानवर दबाव वाढला आहे. युद्धाची शक्यता आणि परमाणु वापराचा धोका वाढल्याने परिस्थिती गंभीर आहे. भारताने दहशतवादाविरुद्ध कठोर भूमिका घेतली. त्यासोबत दीर्घकालीन शांततेसाठी कूटनीतिक प्रयत्नांची गरज आहे. युद्ध हा उपाय नव्हे. शांतता हाच अंतीम उपाय असेल. हे रशिया, युक्रेन युद्धातून दोन्ही देशांनी शिकावे. शहाणपणाने वागावे एवढेच! ■ ■

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भुमिकेचा 'वैश्विक कॅनव्हास'

**व्दितीय महायुद्धातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 'दूरदृष्टी'च्या भूमिकेने भारत देशाला वाचविले क्रूरकर्मा हिटलरच्या पारतंत्र्यात जाण्यापासून...!**

*09 मे भुमिका नाट्यानुभव*
*सायंटिफिक सभागृह - सायं 6.30*

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय स्वातंत्र्य चळवळ लढा ऐरणीवर असतांनाच द्वितीय महायुद्धाची सुरूवात झाली. हुकूमशहा मुसोलिनी, स्टॅलिन, नेपोलियन, हुकूमशहा हिटलर यांचे देश व सोबतीला इतर देश असे 'शत्रू पक्ष' म्हणून एका बाजूला तर फ्रांस, अमेरिका, इंग्लंड आदि देश 'मित्रपक्ष' म्हणून दुसऱ्या बाजूला अशी दुसऱ्या महायुद्धात जगाची वाटणी झाली. शत्रू पक्षासोबत जगातील तीन ते चार हुकूमशहांचा भरणा असल्याने सहाजिकच हुकूमशाही - झोटिंगशाही आणि लोकशाही अशी विभागणी वाट्याला आली. हिटलरसह त्याच्या हुकूमशहा मित्रांची जग गिळंकृत करण्याची अभिलाषा तर इंग्लिश साम्राज्याचा जगभरातील विस्तार... एक बाजू दगड तर दुसरी वीट.. त्यात

हिटलरच्या अघोरी प्रवृत्तीची जगाने घेतलेली धास्ती अशा परिस्थितीत जागतिक लोकशाहीचे जतनासाठी जगाने कोणत्या बाजूला जावे हा कळीचा मुद्दा ऐरणीवर आला असताना... तत्कालीन शिर्ष भारतीय नेते ही संभ्रमी अवस्थेत सापडलेले... इंग्लंडच्या गुलामीत भारत असल्याने या आयत्या संधीचा फायदा घेऊन इंग्लंडला धडा शिकवला जावा ही व्यवहार्यता अनेक शिर्ष नेत्यांना पचनी पडल्याने मित्र पक्षाला या युद्धात सहकार्य करू नये अशी एक भूमिका घेतली गेली...

तर, क्रूरकर्मा हुकूमशहा हिटलरच्या घशात देश गेला तर पुढील दोनशे वर्षे स्वातंत्र्य विसरून जावे लागेल. तसेच जगातील लोकशाही टिकून राहण्यासाठी या महायुद्धात कोणत्याही परिस्थितीत हिटलरचा पराभव हाच एकमेव पर्याय असा हा फिलॉसॉफीकल अप्रोच...असलेली दुसरी भूमिका घेतली गेली....

अडवणूकीची व्यवहार्यता की दुरदृष्टी ठेवून तत्वाची जोपासना ...?

असे भारतीय नेत्यांमध्ये पडलेले उभे दोन तट...

शत्रू पक्षाच्या समर्थनार्थ असलेल्या भारतीय नेत्यांच्या भुमिकेला गोंजारण्याकरिता तत्कालिन प्रसारमाध्यमे पुढे सरसावली आणि या भूमिकेमुळे हुकूमशहा हिटलरच्या विजयामुळे भारताचे होणारे आहेत विचारात न घेता मोठ्या प्रमाणात या पक्षांच्या व त्यांच्या नेत्यांच्या भुमिका प्रसिद्धीझोतात आणून गौरवान्वित केल्या गेल्या तर, भारतातील एकमेव स्वतंत्र मजूर पक्ष आणि पक्षनेते डॉ.




बाबासाहेब आंबेडकर, ज्यांनी महायुद्धाच्या सुरवातीपासून तर शेवटापर्यंत दृढ आणि खंबीर भूमिका घेऊन मित्रराष्ट्रांना बिनशर्त समर्थन देण्याची भूमिका घेतली व शेवटपर्यंत या भुमिकेवर ते व त्यांचा पक्ष ठाम राहिलेत. परिणामी मित्र पक्षाच्या विजयामुळे हुकूमशहा हिटलरच्या तावडीतून व पारतंत्र्याच्या मगर - मिठीतून देश वाचवला गेला व एवढेच नव्हे तर इंग्रजांच्या गुलामगिरीतून ही देश मुक्त झाला. इंग्रज या युद्धात शेवटच्या खंदकात असल्याने त्यांना भारताला स्वातंत्र्य दिल्यावाचून गत्यंतर नाही. याची वाच्यता ते वारंवार आपल्या भाषणातून, आपल्या वृत्तपत्रीय अग्रलेखातून सातत्याने करते राहिले. हिटलरचा विजय या महायुद्धात झाला तर पुन्हा दिडशे दोनशे वर्षांचे पारतंत्र्यत आपला देश जाऊ शकतो. अशी सुरवातीपासून शेवटपर्यंत घेतलेली स्वतंत्र मजूर पक्षनेते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची रोखठोक भूमिका...

परंतु एवढी प्रखर देशहित कारक, राष्ट्रहितवादी भुमिका मांडण्यासाठी कोणताही लेखक, पत्रकार, प्रसिद्ध माध्यमे पुढे कुणीही आले नाहीत आणि ही प्रखर देशभक्तीने ओतप्रोत अशी भुमिका इतिहासाच्या उदरात गडप होणे जवळजवळ निश्चित झाले होते.

जर यदाकदाचित स्मृति शेष मार्शल ॲड. विमलसूर्य चिमणकर सरांसारखा जागतिक संदर्भासह मांडणी करणारा तगडा लेखक या भूमिकेच्या मांडणीसाठी नव्वदच्या दशकात मिळाला नसता आणि गळ्यातील ताईत झालेली बानाई 'नाट्यानुभव' घेऊन आली नसती तर ही भुमिका तशीच दडपली गेली असती का? मग आता या भूमिकेला 'न्याय' देण्याची जबाबदारी कोण स्वीकारणार? डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भूमिकेला खऱ्या अर्थाने 'देश गौरव' म्हणून कोण संबोधणार? मृत्यूनंतर अडोतीस वर्षांनी 'भारतरत्न पुरस्कार' देणारे 'भारत शासन'...? की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या द्वितीय महायुद्धातील, क्रूरकर्मा हिटलरच्या तावडीतून भारत देशाला सोडवणारी आणि इंग्रजांना भारताला स्वातंत्र्य देण्यास भाग पाडणारी देशहिताची प्रखर भुमिका...ज्या भूमिकेकडे जाणीवपूर्वक डोळेझाक केलेले तत्कालीन इतिहासकार? की, जागृतीचा अग्नी तेवत ठेवणारे आम्ही भारताचे लोक...? डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या द्वितीय महायुद्धातील दृढ-निश्चयी, खंबीर भूमिकेला 'देश गौरव' म्हणून आम्ही भारतीय कधी स्वीकारणारे आहोत? हे मार्मिक प्रश्न चिन्ह...

या भूमिकेला सविस्तररित्या जाणून घ्यायची जबाबदारी आम्हा भारतीयांची..

यासोबतच व्हिएतनाम मध्ये हो-ची-मिन्ह यांनी सुद्धा व्हिएतनाम तेंव्हा फ्रान्सच्या गुलामगिरीत असतांनाही फ्रान्ससह मित्र राष्ट्रांना समर्थन दिले होते... या सर्व बाबी विस्तृतपणे जाणून घ्या... संदर्भ - समता सैनिक दल जलसंपदा मैत्री संघ, सिरी विजय देवराजसर यांचे विशेष सौजन्याने, तसेच गळ्यातील ताईत 'बानाई' नागपूरद्वारा प्रकाशित पुस्तके... 'डॉ आंबेडकर आणि द्वितीय महायुद्ध' लेखक - स्मृतिशेष मार्शल ॲड. विमलसूर्य चिमणकर द्वितीय महायुद्धातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भुमिकेचा 'वैश्विक कॅनव्हास'...

(क्रमशः)

**वृत्तांकन - जयंत इंगळे**
सचिव बानाई नागपूर

## जातिभेदाच्या नाकावर टिच्चून शोषित महिलांनी उभा केला हक्काचा




स्त्री स्वातंत्र्य मुक्तसंवाद

संयोजक

प्रा. माधुरी गायधनी दुपटे
मो. 9130088095


**शोषित, वंचित महिलांच्या एका समूहाने आपल्या हक्कासाठी भांडून न्यायाची वाट ज्या माध्यमातून मोकळी करून घेतली, तो प्रयोग म्हणजे 'बहिणी दरबार'.**

कलसिया देवी नामक दलित महिलेच्या संघर्षातून याची सुरुवात झाली. मध्य प्रदेशच्या रीवा जिल्ह्यातील डभौरा गावानजीकच्या आंबेडकर नगरमध्ये कलसिया देवी राहयच्या. त्यांना जातीभेदाचा अनुभव येत होता. घरामागे असलेल्या बोअरवेलवरून पाणी भरताना उच्चवर्णीयांकडून त्यांना वारंवार अडवले जात होते. अनेक दिवसांपासून हा त्रास सुरू होता. जातीवरुन टोमणे, शिव्या असे सगळे त्या निमुटपणे सहन करत होत्या. एकदा पहाटे कलसिया देवी पाणी भरण्यासाठी बोअरवेलवर गेल्या तेव्हा, काही उच्चवर्णीय तिथे आले. 'तुला पाणी नको भरू म्हणून सांगितले ना, इथे पाणी भरून तू बोअरवेल बाटवलीस' असे म्हणत त्यांनी पाण्याचा हंडा, बादली पायांनी लाथाडून लावली आणि त्यांना हाकलले. या घटनेने मात्र कलसिया देवींच्या संयमाचा बांध मात्र तुटला. त्यांनी गावातल्याच उषादेवी यांना ही घटना सांगितली. त्यानंतर कलसिया, उषादेवींसह काही महिला पोलिसांकडे तक्रार दाखल करण्यास गेल्या. मात्र, पोलिसांनी त्यांचे ऐकूनच घेतले नाही. दिवसभर पोलीस ठाण्यात बसून शेवटी या महिला घराकडे परतल्या. दुसऱ्या दिवशी त्या सगळ्या जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालयात गेल्या. घडलेली घटना सांगितली आणि कारवाईचे आश्वासन घेऊन परतल्या. पण, आश्वासन कागदावरच राहू नये म्हणून, आपले म्हणणे कागदावरच उतरवायचे त्यांनी ठरवले. त्यानंतर आठवीत शिकत असलेल्या सिलू नामक विद्यार्थिनीकडून संपूर्ण घटनाक्रम कागदावर उतरवून घेतला. नंतर, या हस्तलिखित दहापानी पत्रकाच्या 10 प्रती झेरॉक्स करून गावात, शासकीय कार्यालयात वाटप केल्या. महिलांच्या या प्रयोगाला चांगला प्रतिसाद मिळाला. रिवासारख्या भागात जिथे महिलांना कायम डोक्यावर पदर घेऊन संस्कृतीच्या नावाखाली समाजाच्या धाकात जगावे लागते, त्यांनी असे काहीतरी करणे हे लोकांच्या कल्पनाशक्तीच्या पलिकडचे होते. या प्रतिसादानंतर महिलांनी एक गट तयार करून हे हस्तलिखित पत्रक नियमितपणे काढायचे ठरवले आणि त्याला नाव दिले 'बहिणी दरबार'. 'न खींचो कमान, न तलवार निकालो, जब तोप हो मुकाबिल तब अखबार निकालो', अकबर इलाहाबादी यांचा हा शेर 'बहिणी दरबार'साठी अतिशय समर्पक ठरतो.कलसियाबरोबर घडलेली घटना 2007 सालची आहे. एकतर महिला ती मागास, दलित जातीतली, साडीच्या पदराआड तोंड लपवून जगत आलेली. आमचे म्हणणे कोण ऐकून घेणार होते? म्हणून आम्हीच आमचा आवाज व्हायचे ठरवले. पण हे करायचे कसे? हा मोठा प्रश्न होता. त्यावेळी आम्ही, दलित, आदिवासी, बहुजन अशा मिळून 10 महिला आणि बहुसंख्य महिला अशिक्षितच होत्या. तरीही कलसिया देवींसह आणखी एक-दोन महिलांबरोबर घडलेली घटना लिखीत स्वरुपात सर्वांपर्यंत पोहोचवायचे ठरवले आणि कामाला लागलो. अन्यायाला वाचा फोडण्यासाठी लेखणीहुन अधिक धारदार तलवार नाही, हे या अशिक्षित महिलांना कळाले होते. त्यांनी त्याचा उपयोग




करायचे ठरवले. दलित आणि आदिवासी महिलांच्या या गटाला उच्चवर्णीय व्यवस्थेशी दोन हात करणे म्हणजे आपल्या अंगावर थेट संकट ओढावून घेण्यासारखे होते. तरीही त्यांनी आपला निर्णय कायम ठेवला. 3 जानेवारी 2008 रोजी 'बहिणी दरबार'चा पहिला हस्तलिखित अंक निघाला आणि तेव्हापासून आजतागायत दर महिन्याला या महिला हे हस्तलिखित पत्रक काढतात. त्याच्या झेरॉक्स प्रति काढून विविध कार्यालय, शासकीय कार्यालय, सामाजिक संस्था, ग्रामपंचायत अशा ठिकाणी वितरित करतात. वितरणाच कामही या महिलाच करतात. याबाबत बोलताना उषा देवी सांगतात, 'महिलांचा आवाज म्हणून बहिणी हे नाव ठरलेच होते आणि आमच्या बघेली भाषेत बैठक किंवा एकत्र जमून चर्चा होत असेल तर त्याला दरबार असे म्हणतात. म्हणून आम्ही याचे नाव 'बहिणी दरबार' असे ठेवले. महिलांनी महिलांच्या हक्कासाठी काढलेले महिलांचे मुखपत्र. हे पत्रक शेकडो महिलांची ओळख बनलेय, याचा आनंद वाटतो. एखाद्या समस्येचे जोपर्यंत निवारण होत नाही, तोपर्यंत त्याचा पाठपुरावा करतो. लेखनीतून मांडली संघर्षाची कथापत्रकारितेच्या व्याख्येत त्या फिट तर बसत नाहीत. पण म्हणून त्यांचा अस्तित्वासाठीचा संघर्ष आणि त्यासाठी केलेला हा प्रयोग कमीही ठरत नाही. यातील बहुतांश महिला दलित, आदिवासी समुहातील होत्या. त्यांना शिक्षणाचा फार गंधही नव्हता. सुसभ्य म्हणवल्या जाणाऱ्या पण वर्णव्यवस्थेचा भडीमार असलेल्या समाजात शोषित, अशिक्षित आणि अतिशय गरीब घरातून आलेल्या या महिलांना आपण सुरु केलेल्या या मोहिमेचे पुढे काय होईल, याची कल्पना नव्हती. पण, व्यवस्थेला आव्हान देतानाच सुरू झालेला त्रास, अपमान, चारित्र्यावर उडालेले शिंतोडे तर कुणाला झालेली मारहाण या सगळ्यांना सामोरे जावे लागल्याचे, 'बहिनी दरबार'च्या महिलांनी सांगितले. मात्र, बदल घडण्यास सुरुवातही झाली होती. पहिल्यांदा पत्रक काढून ते एक-दोन कार्यालयात पाठवल्यानंतर त्यांना प्रतिसाद मिळण्यास सुरुवात झाली. पोलिसांसह काही अधिकाऱ्यांनी येऊन कलसिया देवींचे म्हणणे ऐकून घेतले, तसेच त्या राहत असलेल्या भागात दुसरी बोअरवेल लावून देण्याची हमी दिली. हा या महिलांचा पहिला विजय होता. त्यांनी 'बहिणी दरबार' सुरू ठेवायचे ठरवले आणि दर महिन्याला हे पत्रक निघू लागले. पत्रक वितरित करतानाच इतर महिलांशी बोलून त्यांच्या समस्या ऐकून घेण्यात आल्या. दिवसेंदिवस महिलांचा सहभाग वाढू लागला. प्रत्येकीची वेगळी समस्या होती, त्यांनी आपले म्हणणे या पत्रकाच्या माध्यमातून सांगायला सुरुवात केली. हे हस्तलिखित पत्रक रिवा भागात बोलल्या जाणाऱ्या बघेली भाषेत काढले जाते. याची टॅगलाईन आहे, 'आँखन देखी, कानन सुनी, हाँथन लिखी' वंचितन के खातिर - बहिणी दरबार. म्हणजेच, 'जे डोळ्यांनी बघितले, कानांनी ऐकले तेच हातांनी कागदावर उतरवले - वंचितांसाठी 'बहिणी दरबार' या पत्रकाच्या माध्यमातून महिलांनी कौटुंबिक हिंसा, अत्याचार, बालविवाह, हुंडाप्रथा, जातपात, अस्पृष्यतेसारख्या अनेक घटनांना वाचा फोडली. गावा-गावात पत्रकाचे वितरण करतानाच यात नेमके काय लिहिले हे निरक्षर लोकांना कळावे यासाठी लोकांना एका ठिकाणी गोळा करून पत्रकाचे सामूहिक वाचन सुरू केले. आज हे पत्रक शेकडो महिलांचे मुखपत्र चौथ्या स्तंभाच्या रुपाने खंबीरपणे त्यांचे म्हणणे मांडत आहे. 'आधी उभेही करत नव्हते, आज मानाने खुर्ची देतात. बहिनी दरबारचे कुठलंही रजिस्ट्रेशन नाही. हा महिलांचा एक स्वतंत्र आणि स्वयंचलित गट आहे, त्यांना कुठलं फंडिंगही नाही, त्या स्वखर्चाने पत्रकाच्या प्रति झेरॉक्स करून वितरित करता एका पत्रकासाठी 20 रुपये हीच त्यांची जमापूंजी, पुढच्या महिन्यात निघणाऱ्या पत्रकासाठी कामी येते. महिला वेळातवेळ काढून दर महिन्याला होणाऱ्या बैठकीत सहभागी होतात, आणि आपले योगदान देतात. स्थानिक पातळीवरच्या छोट्याशा उपक्रमाने देशभरात आपले नाव केलेय. एका विद्रोहातून सुरू झालेली बहिनी दरबार नावाची ही क्रांती आज कित्येक उपेक्षित महिला-पुरुषांच्या हक्काचे व्यासपीठ बनली आहे. 1000 महिलांच्या या कुटुंबाचे कार्य स्थानिक पातळीवर निरंतर सुरू आहे. ■ ■

## वाचकांचे विचारपिठ

बहुजन सौरभ

### गुढीपाडवा निमित्ताने

गुढीपाडवा हा सण भारतीयांचा नव्हे, तो राजे संभाजीचा क्रूरपणे मनुनीतीने शूद्र क्षत्रिय भारतीय राज्याचा खून, वध करून विदेशी वैदिक मनुवादी काल्पनिक अंधश्रद्धाळू धार्मिक व्यवसायिकांची आपले राजसत्तेने स्थापलेला सण होय, पेशव्यांचा सण होय गुढीपाडवा. म्हणूनच महाराष्ट्रात हा सण विशेषतः पेशवा वैदिक विदेशी मनुवादी हा सण हर्षउल्हासाने मानतात. त्यांचे सोबत जे पेशवाईत निरक्षर अशिक्षित अज्ञानी इतिहासाची जाणार नसलेले मूळ भारतीय परम्परेने करतात. भारतीयांचा सण म्हणजे श्रमन संस्कृतीचा मांडअवस अर्थात मांडवस होय. फाल्गुनी महिन्यात झाडांना वृक्षांना नवीन पालवी फुले येतात. हा दिवस अमावशेचा असतो. या तिथीला शेतकरी शेतात जुना मांडव पाडून नवीन मांडव आपल्या पाळीव प्राण्यांसाठी बनवितात. आजूबाजूचे सर्व शेतकरी शेतात गोडधोड पक्वान्न घेऊन जातात. शेतात पाच तास वखरण, नांगरण करतात, नवीन मांडवात बसून मिळून जेवण करतात आणि शेतीच्या कामाला सुरुवात करतात. रोज पहाटे शेतात जातात. सूर्य डोक्यावर येईपर्यंत वखरण नांगरण करतात. नवीन मांडवात जनावर बैल, गायी, म्हशी आराम करतात. पुन्हा चार पाच वाजता सूर्याची उन्ह कमी झाली की शेतीचे काम करतात अशी या सणापासून कृषिप्रधान भारतात सुरुवात होते. हे श्रमन संस्कृतीचे नवीन वर्ष मूळ भारतीयांचा सण होय. याच तिथीला वैदिक मनुवादी पेशवे विदेशी अंधश्रद्धाळू काल्पनिक अप्रमाणीत बुद्धीच्या लोकसमूहाने भारतीय शूद्र क्षत्रिय राजसत्ता नष्ट करून आपली सत्ता स्थापन केली आणि ती गुढी म्हणजे भाल्याला राजेचे मुंडके म्हणजे तांब्याचा लोटा, अंगरखा म्हणजे सदरा राज्यांच्या अंगावरले वस्त्र फाडून लटकवितात ती होय. गुढीपाडव्याच्या त्यांचा सण याच तिथीला हल्लीचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी पंचांग तिथीनुसार नागपुरात आले. ते प्रधानमंत्री म्हणून दीक्षाभूमीला आले. रेशीमबागच्या संघ भूमित आले पण लक्षात ठेवा समता आणि विषमता एकत्र राहू शकत नाही. ■ ■

**- अनिरुद्ध शेवाळे**

